# सोलापूर जिल्हा परिषद,सोलापूर

## जिल्हा निवड समिती, सोलापूर

### सोलापूर जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील अनुशेषांची व रिक्त पदे भरणेसाठी जाहिरात.

जाहिरात क्र.१ / २०११ सोलापूर दिनांक ८/९/२०११

सोलापूर जिल्हा परिषदेमधील खालील नमुद पदावर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील तरतुदीनूसार नामनिर्देशनाव्दारे संपुर्णत: तात्पुरत्या व हंगामी स्वरुपात निवडीसाठी पात्र उमेदवारांकडुन विहित नमुन्यात गट-क व गट-ड या संवर्गातील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी (लेखी / मौखीक) महाराष्ट्र ज्ञान मंडळ (Maharashtra Knowledge Corporaton Ltd.(MKCL) Solapur) यांच्या मार्फत स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

अधिक माहिती,अर्ज मिळण्याचे व अर्ज भरण्याचे ठिकाण (MKCL - Website -संकेतस्थळ ) संबधित अधिकृत प्रशिक्षण केंद्र (ALC- Authorised Learning Center ) व http://oasis.mkcl.org/zp2011 या वेबसाईटवर माहिती उपलब्ध होईल. तसेच सदरची जाहिरात जि.प.च्या संकेतस्थळावर (**वेबसाईट - www. zpsolapur.gov.in** ) प्रसिध्द करणेत आली आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, दर्जा व गुण |
|---|---|---|---|---|
| १ | विस्तार अधिकारी (कृषि) | ९३००-३४८०० ग्रेडवेतन- ४२०० | सांविधानिक विद्यापीठांची कृषि विषयातील पदवी किंवा समतुल्य अर्हता धारक. तसेच राज्यातील चार ही कृषि विद्यापीठाकडील बीएस.सी (कृषि/ फलोत्पादन/ वनशास्त्र) बि.टेक, (अॅग्री-इंजि.) तसेच यंशवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडील बीएससी (कृषि/फलोत्पादन) ज्यांनी कृषि कामाची उच्च शैक्षणिक अर्हता व कृषि कामाचा अनुभव प्राप्त असेल किंवा सुधारित कृषिचा ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल. | मराठी इ. १२ वी दर्जा, इंग्रजी, सामान्य ज्ञान , बुध्दीमापन ,तांत्रिक, कृषि संबधि प्रश्न पदवी दर्जा (गुण लेखी १८० + मुलाखत २० एकूण २०० ) |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-२ | ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० | मान्यताप्राप्त विद्यापीठाचे स्नातक असतील, आणि १) बी.एड.पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) घेतल्यानंतरच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतील अगद कनिष्ठ महाविद्यालयातील कमीत कमी तीन वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल किंवा २) बी.एड.पदवी (किंवा तुल्या शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असेल किंवा ३) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरच्या पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल,असे उमेदवार. | मराठी इ.१२ वी दर्जा, शिक्षण शास्त्र संबंधी व इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन प्रश्न पदवी दर्जा (गुण लेखी १८०+मुलाखत २० एकूण २००) |
| ३ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-३ | ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३०० | कोणत्याही शाखेचा (कला,विज्ञान व वाणिज्य) पदवीधर व १) बी.एड., अध्यापनाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक किंवा २) डी.एड,अध्यापनाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक किंवा ३) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरचा ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. | मराठी इ.१२ वी दर्जा, शिक्षण शास्त्र संबंधी व इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन प्रश्न पदवी दर्जा (गुण लेखी १८०+मुलाखत २० एकूण २००) |
| ४ | अंगणवाडी पर्यवेक्षिका (एबाविसेयो) | ९३००-३४८०० ग्रेडवेतन-४१०० | पदवीधर ,परंतु मान्यता प्राप्त विद्यापीठाची समाजकार्य किंवा शिक्षण या विषयातील स्नातकपदवी धारण करीत असलेल्या उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल. | मराठी १२ वी दर्जा, इंग्रजी, सामान्य ज्ञान , बुध्दीमापन पदवी दर्जा (गुण लेखी २०० + मुलाखत २५ एकूण २२५) |
| ५ | औषध निर्माण अधिकारी | ५२००-२०२०० ग्रेडवेतन-२८०० | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आणि महाराष्ट्र औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते. | मराठी, इंग्रजी,सामान्य ज्ञान,गणित इ.१० वी दर्जा ,व औषध शास्त्रा संबधि प्रश्न. (गुण लेखी १८० + मुलाखत २० एकूण २००) |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ५२००-२०२०० ग्रेडवेतन २४०० | विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील. याबाबतीत लेखाशास्त्र व लेखा परीक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारण करणाऱ्या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यंत लेखा विषयक कामाचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. | मराठी इ.१२ वी दर्जा, व इंग्रजी, सामान्य ज्ञान ,बुध्दीमापन,तांत्रिक प्रश्न पदवी दर्जा (गुण लेखी १८० + मुलाखत २० एकूण २०० ) |
| ७ | आरोग्य सेवक (पुरुष) फवारणी कर्मचारी | ५२००-२०२०० ग्रेडवेतन-२४०० | विज्ञान या विषयासह माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण व राष्ट्रीय मलेरिया प्रतिबंध कार्यक्रमांतर्गत हंगामी फवारणी कर्मचारी म्हणून कमीत-कमी ९० दिवस काम केलेले उमेदवार | मराठी,इंग्रजी,सामान्यज्ञान, गणित,तांत्रिक इ.१० वी दर्जा (गुण लेखी १८०+ मुलाखत २० एकूण २०० ) |
| ८ | आरोग्य सेवक (महिला) | ५२००-२०२०० ग्रेडवेतन-२४०० | ज्यांची अर्हता प्राप्त साहयकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील.(सहाय्यक परिचारीका प्रसाविका -१८ महिन्याचा कोर्स उत्तीर्ण व महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल मुंबई यांचेकडे नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीस पात्र) | मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान,गणित, तांत्रिक इ.१० वी दर्जा (गुण लेखी १८०+ मुलाखत २० एकूण २०० ) |
| ९ | कंत्राटी ग्रामसेवक | २५००/- दरमहा मानधन | उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण, किंवा शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम),किंवा शासन मान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.उब्ल्यु.) आणि संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. | इंग्रजी, सामान्यज्ञान, गणित, तांत्रिक प्रश्न इ.१२ वी दर्जा (गुण लेखी १८०+ मुलाखत २० एकूण गुण २००) |
| १० | आरोग्य पर्यवेक्षक (पुरुष) | ९३००-३४८०० ग्रेडवेतन ४२०० | मान्यता प्राप्त विद्यापीठांची विज्ञान शाखेची पदवी व बहुउददेशीय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक | मराठी इ.१२ वी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबधि प्रश्न पदवी दर्जा (गुण लेखी १८०+ मुलाखत २० एकूण २००) |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ५२००-२०२०० ग्रेडवेतन - २४०० | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व स्थापत्य अभियांत्रिक सहाय्यकाची १ वर्ष मुदतीचा पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण किंवा आर्किटेक्चरल ड्रॉफ्टस्मन (वास्तुशास्त्रीय आरेखक) किंवा कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) किंवा आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाठयक्रम उत्तीर्ण किंवा स्थापत्य अभियांत्रिकी संबधातील उच्च अर्हता प्राप्त पदविका/पदवीधारक. | मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान,गणित इ.१० वी दर्जा व तांत्रिक प्रश्न (गुण लेखी १८०+ मुलाखत २० एकूण २०० ) |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ५२००-२०२०० ग्रेडवेतन २४०० | संविधिमान्य विद्यापीठाची पदवी | मराठी इ.१२ वी दर्जा, व इतर पदवी दर्जा (गुण लेखी २०० ) |
| १३ | पशुधन पर्यवेक्षक | ५२००-२०२०० ग्रेडवेतन २४०० | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालनालयाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठांने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण परीक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठामार्फत चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठांने चालविलेला दोन वर्षाचा दुग्ध व्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण. किंवा वैधानिक विद्यापीठांमधील पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. | मराठी १२ वी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबधि प्रश्न पदविका दर्जाची परीक्षा (गुण लेखी १८०+ मुलाखत २० एकूण २००) |

| .अ .क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, दर्जा व गुण |
|---|---|---|---|---|
| १४ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ५२००-२०२०० ग्रेडवेतन १९०० | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचा-यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परिक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त,शासकीय परिक्षा विभाग,शिक्षण संचालनालय ,महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दरमिनीटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवुन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण. परंतु असे की, उक्त दोन भाषापैकी कोणत्याही एका भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार ,नियुक्त केलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत दुस-या भाषेतील दर मिनिटास ३० शब्दाहूनकमी नाही अश्या टंकलेखानाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील,परंतु आणखी असे की, इंगजी विषय घेवुन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. | मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान,गणित इ.१० वी दर्जा (गुण लेखी २०० ) |
| १५ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण, महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचा-यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परिक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परिक्षा विभाग, शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी टंकलेखनाचे दरमिनीटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवुन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण. झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. परंतु असे की, उक्त इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचे अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, गणित इ.१० वी दर्जा (गुण लेखी २०० ) |
| १६ | वाहन चालक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन-१९०० | उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण, चार चाकी मोटार वाहने चालविण्याची अनुज्ञाप्ती धारण करीत असतील, मोटार यंत्ररचनेचे परिपुर्ण ज्ञान असेल. | मराठी,सामान्य ज्ञान,गणित इ.(गुण लेखी १००) |
| १७ | परिचर | ४४४०-७४४० ग्रेडवेतन-१३०० | मान्यता प्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत-कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण. | मराठी ,सामान्यज्ञान,गणित इ.४थी दर्जा (गुण लेखी ७५ + मुलाखत २५ एकूण १००) |

## भरावयाच्या रिक्त पदांचा (सामाजिक व समांतर आरक्षण निहाय) तपशील

| अ. क्र. | पदाचे नांव | भरावयाची एकूण पदे | प्रवर्ग | रिक्त पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | राष्ट्रीय खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | इतर (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) | अपंग |
| १ | विस्तार अधिकारी (कृषी) | ३ | अ.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | | | भज(क) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | | | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-२ | १ | विजा(अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ३ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-३ | १ | अ.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ४ | पर्यवेक्षिका (एबाविसेयो) (फक्त महिलांकरिता) | १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ पद लो-व्हीजन (४० ते ६०%) / अस्थिव्यंग |
| ५ | औषध निर्माण अधिकारी | १ | अ.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | २ | अ.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | | | अ.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ७ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | ८४ | अ.जाती | ६ | ० | १ | ० | ० | ० | १ | ४ | २ पद एका पायाने अपंग |
| | | | अ.जमाती | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ३ | |
| | | | भज(ड) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | |
| | | | इमाव | १३ | ० | २ | १ | ० | १ | १ | ८ | |
| | | | खुला | ५९ | ० | ९ | ३ | १ | ३ | ६ | ३५ | |
| ८ | आरोग्य सेवक (महिला) | ५५ | अ.जाती | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ३ | २ पद एका पायाने अपंग |
| | | | अ.जमाती | ५ | ० | १ | ० | ० | ० | ० | ४ | |
| | | | इमाव | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ३ | |
| | | | खुला | ४२ | ० | ६ | २ | १ | २ | ४ | २५ | |
| ९ | कंत्राटी ग्रामसेवक | १२९ | अ.जाती | ११ | ३ | २ | १ | ० | १ | १ | ३ | ५ पदे कर्णबधीर व ५ पदे लो-व्हीजन (४० ते ६०%) |
| | | | अ.जमाती | १४ | ४ | २ | १ | ० | १ | १ | ५ | |
| | | | विजा(अ) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| | | | भजब | ५ | १ | १ | ० | ० | ० | ० | ३ | |
| | | | भजड | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | |
| | | | इमाव | ३३ | १० | ५ | २ | १ | २ | ३ | १० | |
| | | | खुला | ६१ | १८ | ९ | ३ | १ | ३ | ६ | ११ | |
| १० | आरोग्य पर्यवेक्षक (पुरुष) | १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ पद एका पायाने अपंग |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ८ | अ.जमाती | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | २ पदे एका पायाने अपंग/ एका हाताने अपंग , १ पद -कर्णबधीर |
| | | | भजड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |

| अ. क्र. | पदाचे नांव | भरावयाची एकूण पदे | प्रवर्ग | रिक्त पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | राष्ट्रीय खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | इतर (समांतर आरक्षा व्यतिरिक्त) | अपंग |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | १ | अ.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| १३ | पशुधन पर्यवेक्षक | २ | अ.जमाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| १४ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ५ | अ.जमाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ पद लो-व्हीजन (४० ते ६०%) |
| | | | भज(ड) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| १५ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | २ | अ.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | | | अ.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| १६ | वाहन चालक | ३ | अ.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | | | इमाव | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० |
| १७ | परिचर | ५ | भज(ड) | ५ | १ | १ | ० | ० | ० | ० | ३ | ० |

**<u>तसेच नमुद संवर्गाच्या लेखी परीक्षेसाठी विषयवार प्रश्न व गुण खालील प्रमाणे राहील.</u>**

| अ.क्र | संवर्ग | मराठी संबंधित प्रश्न | | इंग्रजी संबंधित प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | गणित संबंधित प्रश्न | | बुध्दीमापन संबंधित प्रश्न | | तांत्रिक प्रश्न संबंधित प्रश्न | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गण | प्रश्न | गुण |
| १ | विस्तार अधिकारी (कृषि) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-२ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० |
| ३ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-३ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० |
| ४ | पर्यवेक्षिका (एबाविसेयो) | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | ० | ० | २० | ५० | ० | ० | ८० | २०० |
| ५ | औषध निर्माण अधिकारी | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | ३२ | ८० | ७२ | १८० |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० |
| ७ | आरोग्य सेवक (पुरुष) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | ३२ | ८० | ७२ | १८० |
| ८ | आरोग्य सेवक (महिला) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | ३२ | ८० | ७२ | १८० |
| ९ | कंत्राटी ग्रामसेवक | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | ३२ | ८० | ७२ | १८० |
| १० | आरोग्य पर्यवेक्षक | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | ३२ | ८० | ७२ | १८० |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | ० | ० | २० | ५० | ० | ० | ८० | २०० |
| १३ | पशुधन पर्यवेक्षक | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० |
| १४ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक)/ (लेखा) | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | ० | ० | ० | ० | ८० | २०० |
| १५ | वाहन चालक | ३० | ३० | ० | ० | ५० | ५० | २० | २० | ० | ० | ० | ० | १०० | १०० |
| १६ | परिचर | २५ | २५ | ० | ० | २५ | २५ | २५ | २५ | ० | ० | ० | ० | ७५ | ७५ |

**<u>टिप</u> :- अ )** वरील जाहिरातीत नमुद सर्व पदापैकी काही पदे ही एप्रिल २०१२ अखेर रिक्त होणारी आहेत. सदरची पदे जस-जशी रिक्त होतील त्यानुसार त्या-त्या पदावर निवड केलेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल.

**ब)** समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

**क)** पदांच्या संख्येत व आरक्षणामध्ये बदल होवू शकतो. निवड यादीमध्ये नांव असले तरी नियुक्ती बाबत हक्क सांगता येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**ड)** सदर जाहिरात या कार्यालयाने शासनाकडून मागविलेल्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे. मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर अथवा अमान्य झाल्यानंतर पदामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

**इ)** कंत्राटी ग्रामसेवक म्हणून नियुक्त दिलेल्या उमेदवारांना दरमहा रुपये २५००/- एकत्रित वेतन दिले जाईल. ग्रामसेवकांकडे आर्थिक व्यवहार असल्यामुळे उमेदवारांकडून नेमणूक देण्यापूर्वी रु.१०,०००/- सुरक्षा ठेव व दोन व्यक्तीचे जामीनपत्र घेण्यात येईल

**<u>वयोमर्यादा-</u>**

वरील पदासाठी वयोमर्यादा मागासवर्गीय व बिगरमागास वर्गीयासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे राहील तसेच मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व बिगर मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे राहील. तथापि, अपंग/ माजी सैनिक/ प्रकल्पग्रस्त /भुकंपग्रस्त यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे व अंशकालीन कर्मचारी साठी ४६ वर्षे आणि राष्ट्रीय खेळाडूसाठी ५ वर्षे शिथीलक्षम राहील. तसेच संरक्षण दलात ६ महिन्यापेक्षा जास्त सेवा केलेल्या माजी सैनिकाकरिता सेवा अधिक ३ वर्षे इतकी विहित वयोमर्यादेत सुट देण्यात येईल व स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य यांच्यासाठी उच्च वयोमर्यादा ४५ वर्षे शिथिलक्षम राहील. तसेच आधीपासून जि.प.सेवेत असलेल्या उमेदवारांना (कंत्राटी वगळून) वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. तसेच सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी यांच्यासाठी वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठी सन १९८०-१९८१ ते १९८६-१९८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची १ वर्षे मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण केली आहे अशा उमेदवारांच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून वयोमर्यादा ४७ वर्षे राहील. तसेच आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी या संवर्गासाठीच्या उमेदवारांची वयाची अट मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट यचिका क्र.६२१५/२००९ मध्ये दिनांक ५.११.०९ रोजी दिलेल्या निकालाची अवमान्यता होवू नये म्हणून ४५ वर्षापर्यंत शिथिल करणेत येत आहे. तथापि,सदर निकाला विरुध्द सोलापूर जि.प.ने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या याचिका क्र.SLP Civil Diary 21242/2011 चा निकाल अशा उमेदवारांवर बंधनकारक राहील.

**(उमेदवारांचे किमान व कमाल वय दिनांक २८.९.२०११ रोजीच्या दिनांकास परिगणित करण्यात येईल)**

**महत्वाच्या सुचना** :- १) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज MKCL च्या संबधित अधिकृत प्रशिक्षण केंद्र (ALC- Authorised Learning Center ) वर **दि.१२.९.२०११ ते २८.९.२०११** या विहित कालावधीत उपलब्ध होतील. या अधिकृत ALC ची माहिती http://oasis.mkcl.org/zp2011 या संकेतस्थळावर मिळेल.तसेच सोलापूर जिल्हयांतील ALC ची यादी जि.प.संकेतस्थळ **(www. zpsolapur.gov.in)** वर उपलब्ध आहे. २) सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्जाची किंमत रु.२५/- (अक्षरी- रुपये पंचवीस ) फक्त राहील. ती रोखीने उपरोक्त ALC वर देऊन परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध /प्राप्त करुन घ्यावा. ३) सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज संबधित अधिकृत ALCवर दिनांक **१२/९/२०११** पासून उपलब्ध राहतील. सदर अर्ज स्वीकारण्यांची अतीम तारीख **२८/९/२०११** रोजी सायंकाळी १८.०० वाजेपर्यत राहील. तद्नंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. उमेदवारांने MKCL च्या संबधित अधिकृत प्रशिक्षण केंद्रामार्फत (ALC) भरलेले अर्जच स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.पोस्टाव्दारे /स्पीड पोस्ट / कुरिअर व्दारे इत्यादी आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.४) परिपुर्ण अर्ज स्वीकारण्याची सोय MKCL च्या अधिकृत ALCकेंद्रावर करण्यात आलेली आहे. अर्ज परिपुर्ण असल्यासच स्वीकारला जाईल. व त्याबाबतची पोहोच व उमेदवारांने भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता (Summary Sheet) सदर अधिकृत केंद्राकडून त्याच वेळेस दिली जाईल. ५) उमेदवारांनी ज्या ALC प्रशिक्षण केंद्रावरुन अर्ज प्राप्त करुन घेतले आहेत त्याच ALC केंद्रावर ते आवश्यकते कागदपत्र व रोखीने परीक्षा शुल्क सादर करणे आवश्यक राहील.

**परीक्षा शुल्क (फॉर्म फी वेगळी)**

| अ.क्र. | पदांचे नांव | परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | मागासवर्गीय | बिगर मागासवर्गीय |
| १ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक)/ कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) / (लेखा)/ वाहन चालक | रु.७५/- | - |
| २ | इतर सर्व पदांसाठी | रु.१००/- | रु.२००/- |

टिप :- **माजी सैनिक उमेदवारांनी आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही**

वरील प्रमाणे परीक्षा शुल्क व फॉर्म फी MKCL च्या संबधित प्रशिक्षण केंद्र (ALC) येथे रोखीने भरावे व पावती घ्यावी. सदर परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील.

**सर्व पदांसाठी समान सूचना**

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा (आधिवास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक)

२. उमेदवारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३. उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवित आहे.

४. वरील सर्व पदासाठी गुणवत्ता यादी, संवर्ग व प्रवर्गनिहाय संपूर्ण राज्यातून प्राप्त होणा-या अर्जातून सोलापूर जिल्हयासाठी तयार करणेत येईल.

५. अपंगासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पदांसाठी जाती प्रवर्गाचे आरक्षण लागू नाही.सर्व जाती प्रवर्गातील तसेच खुला प्रवर्गातील अपंग उमेदवार अर्ज करु शकतात.

६. अपंग उमेदवारांनी लेखी परीक्षेसाठी जिल्हा परिषदेकडून लेखनिक घेणार किंवा कसे याबाबत संबंधित परीक्षेपूर्वी ४ दिवस अगोदर पर्यत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नांवे संबधित खातेप्रमुख जि.प.सोलापूर यांचेकडे लेखी निवेदन सादर करणे आवश्यक राहील.परीक्षेच्या दिवशी लेखनिक मागणी केल्यास विनंतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. उमेदवारांने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा.

८. उमेदवारांने अर्जावर सही करणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अपात्र करणेत येईल.

९. उमेदवारांने स्वत:चे प्रवेश पत्र (हॉल तिकिट) संबधित परीक्षेच्या दिनांकापूर्वी ५ दिवस अगोदर अर्जाची पोहोच दाखवून जेथे अर्ज केला आहे त्या ALC केद्रामधून प्राप्त करुन घेणेची जबाबदारी उमेदवारांची राहील. तसेच परीक्षा प्रवेशपत्र (हॉल तिकिट) पोस्टाने अगर इतर मार्गाने पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. उमेदवार एकापेक्षा अधिक पदाकरिता अर्ज करु शकतील, तथापि प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज करणे, आवश्यकती सर्व कागदपत्रे जोडणे व विहित परीक्षा शुल्क भरणे अपरिहार्य राहील.

११. पदासाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणा-या परिक्षेची रुपरेषा , वेळापत्रक , परिक्षा केंद्र ,बैठक क्रमाक इ.बाबींची माहिती जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर जि.प.संकेतस्थळ **(www. zpsolapur.gov.in)** व M K C L च्या संबधित ALC सेंटरवर व M K C L च्या संकेत स्थळावर (Website) उपलब्ध करुन देण्यात येईल.याबाबत उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२. उमेदवारांचा अर्ज उमेदवारांस प्रवेशपत्र दिल्यानंतरही पद भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळून आल्यास तो उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

१३. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

१४. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला इ.प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रति जोडणे अनिवार्य आहे. साक्षांकित प्रति केंद्र/ राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोष्ट मास्तर, मान्यता प्राप्त विद्यालय/महाविद्यालयांचे मुख्याध्यापक / प्राचार्य,विशेष कार्यकारी अधिकारी किंवा याबाबत प्राधिकृत करण्यात आलेल्या व सक्षम अधिका-यानेच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

१५. शासकीय- निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या सक्षम प्राधिका-यांच्या पूर्व परवानगीने करावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

१६. महिलांसाठी असलेले आरक्षण हे संबधित सामाजिक प्रवर्गासाठी समांतर राहील, तथापि संबधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यासाठी आरक्षित असलेली पदे इतरत्र आदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील गुणवत्तेनूसार पात्र ठरणा-या पुरुष उमेदवारामधून भरणेत येतील.

१७. खुल्या गटातील महिलांचे समांतर ३०% आरक्षण उन्नत व प्रगत गटात न मोडणा-या (नॉन क्रिमिलिअर) महिलासाठी राहील.तसेच अनुसूचित जाती / जमाती वगळता वि.जा.भ.ज. , विमाप्र, व इमाव प्रवर्गातील सर्व उमेदवारांना (पुरुष,स्त्री) सदर आरक्षणाचा लाभ नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राच्या आधारे मिळेल.

१८. मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर त्यांनी त्यांच्या संबधित जातीचे प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. जर अश्या महिला त्यांच्या संबधित जातीच्या प्रमापपत्राची प्रत सादर करु इच्छित नसतील किंवा सादर करु शकत नसतील तर अश्या महिला उमेदवारानी खुल्या प्रवर्गातील महिला प्रमाणेच नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.तसेच त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे आवश्यक ते प्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

१९. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग,भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) किंवा इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी अमागास उमेदवारांप्रमाणे आवश्यक संपूर्ण परीक्षा शुल्क पाठविणे आवश्यक आहे व ते खुल्या गटातील समजण्यात येईल.तसेच ते वयोमर्यादेतील सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाहीत.तसेच त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे आवश्यक ते प्रमाणे परीक्षा शुल्क पाठविले नसल्यास त्यांचे अर्ज फेटाळण्यात येतील व यासंबंधी कोणत्याही बदलाची दखल घेतली जाणार नाही.

२०. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटूंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील नियम ४ मधील तरतुदीनूसार लहान कुंटूंब मर्यादेचे नमुना-अ मधील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२१. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राकिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक ३०.४.२००५ मधील तरतुदीनुसार राहील.

२२. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

२३. रिक्त पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी/ जास्त बदल होण्याची शक्यता आहे. परिक्षेचा प्रकार , पदाची संख्या , आरक्षण याबाबत बदल करणे , परिक्षा कोणत्याही टप्यावर स्थगित करणे वा रदद करणे किंवा अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती , सोलापूर यांनी स्वतः कडे राखून ठेवलेला आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

२४. उपरोक्त पदांसाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र (सेवायोजन कार्यालय), आदिवासी प्रकल्प अधिकारी, यांचेकडून प्राप्त होणा-या जनगणना / अंशकालीन कर्मचा-यांची शिफारस होणा-या उमेदवारांनी या जाहिरातीत नमुद सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून त्या-त्या पदांसाठी विहित परीक्षा शुल्क भरुन अर्ज करणे बंधनकारक राहील.

२५. शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४ /दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

२६. निवड प्रक्रिया सुरु झाल्यांनतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती /अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रदद करण्यात येईल.

२७. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.बीबीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९ -१६ -ब दिनांक ५ नोव्हेंबर २००९ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीय जात प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती दिली जाणार नाही.

२८. अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी करणे आवश्यक राहील तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडाणे बंधनकारक राहील. अशंकालीन समांतर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांने संचालक,रोजगार व स्वंयरोजगार यांचे कार्यालयात नोंदणी केलेली असणे अनिर्वाय आहे.अर्जासोबत त्यांची छायांकित प्रत साक्षांकित करुन जोडावी अन्यथा,आरक्षणांचा लाभ दिला जाणार नाही.

२९. शासन परिपत्रक क्र.पीआरई/२००४/३८५५/प्राशि-१ दिनांक २ जून २००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिक अथवा युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुंटूबातील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना पात्र समजण्यात येईल.

३०. शासन निर्णय दि.१३ जानेवारी २००९ नुसार अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास वर्ग यामधील उन्नत व प्रगत व्यक्ती /गट यामधील उमेदवारांनी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षातील वैध नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राची साक्षांकि त प्रत सादर करणे किंवा प्रमाणपत्र काढणेसाठी केलेल्या अर्जाची पुराव्याची साक्षांकित प्रत,किंवा हमीपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा,अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.त्याचप्रमाणे मुलाखतीवेळी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे मुळ नॉनक्रिमिलिअर प्रमाणपत्र सादर न केलेस मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल.

३१. वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) / (लेखा) या पदास मुलाखत नसल्याने सदर पदास अर्ज करणा-या उपरोक्त अ.क्र.३० मध्ये नमुद प्रवर्गातील उमेदवारांने सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षातील वैध नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र दि.११.११.२०११ रोजी सांय.१७.३० पर्यत साक्षांकित प्रत सामान्य प्रशासन विभाग १ जि.प.सोलापूर या कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर उमेदवारांना अपात्र करणेत येईल.

३२. नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेणेत येईल.याबाबत सर्व उमेदवारांना वर्तमान पत्रातून जाहिरातीव्दारे कळविणेत येईल.

३३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २७ जून २००८ नुसार उमेदवारानी अंतीम गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

३४. जाहिराती मधील काही मुददे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतीम राहील.

३५. जाहिराती मधील काही बाबी विषयी शंका असल्यास त्यांनी संबधित खातेप्रमुख जि.प.सोलापूर यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.

३६. उमेदवारांनी अर्ज करताना त्यामधील सर्व बाबी परिपुर्ण भरुन अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.एकदा अर्ज ALC सेंटरने स्वीकारल्यानंतर किंवा ALC सेंटरकडे प्राप्त झाल्यानंतर तद्नंतर कुठल्याही कागदपत्रांचा स्वीकार केला जाणार नाही. किंवा उमेदवारांस त्यामध्ये बदल अथवा दुरुस्ती करता येणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३७. जे उमेदवार अधिपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत आहेत अश्या उमेदवारांनी त्या बाबतचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

३८. विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-२ व श्रेणी-३ पदांकरिता अनुभवांच्या दाखल्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) /शिक्षणाधिकारी(माध्यमिक)/ समाज कल्याण अधिकारी/ विशेष समाज कल्याण अधिकारी यांची प्रकरण परत्वे प्रतिस्वाक्षरी अनिवार्य राहील.तसेच नियुक्ती आदेशाची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील.

**लेखी परीक्षेचे वेळापत्रक**

| अक्र | वार व दिनांक | वेळ | पदनाम | वेळ | पदनाम | ज्या ALC केंद्रावरुन अर्ज भरलेला आहे त्याच ALC केंद्रावरुन हॉल तिकिट (परीक्षा प्रवेश पत्र) प्राप्त करुन घेणेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रविवार<br>दि.९.१०.२०११ | स १०.०० ते<br>११.३० | विस्तार अधिकारी (कृषी) | दु २.०० ते ३.३० | पर्यवेक्षिका (एबाविसेयो) /<br>विस्तार अधिकारी (शिक्षण)<br>वर्ग-३ श्रेणी-२ व श्रेणी-३ | परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर |
| २ | रविवार<br>दि.१६.१०.२०११ | स १०.०० ते<br>११.३० | औषध निर्माता/<br>वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | दु २.०० ते ३.३० | आरोग्य सेवक (पुरुष)<br>आरोग्य सेवक (महिला) | परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर |
| ३ | रविवार<br>दि.२३.१०.२०११ | स १०.०० ते<br>११.३० | कंत्राटी ग्रामसेवक/<br>आरोग्य पर्यवेक्षक | दु २.०० ते ३.३० | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर |
| ४ | रविवार<br>दि.६.११.२०११ | स १०.०० ते<br>११.३० | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक)/<br>पशुधन पर्यवेक्षक | दु २.०० ते ३.३० | कनिष्ठ सहाय्यक<br>(लिपिक) / (लेखा) | परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर |
| ५ | रविवार<br>दि.१३.११.२०११ | स १०.०० ते<br>११.३० | वाहन चालक | दु २.०० ते ३.३० | परिचर | परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर |

**<u>निवड कार्य पध्दत</u>**

जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या जिल्हा निवड समिती मार्फत गट-क च्या रिक्त पदासांठी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार निवड प्रक्रिया पार पाडण्यात येईल. गट " ड " च्या रिक्त पदासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निवड समिती मार्फत निवड प्रक्रिया पार पाडणेत येईल.

स्वाक्षरी/-
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र)
जिल्हा परिषद,सोलापूर

स्वाक्षरी/-
सदस्य
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर

स्वाक्षरी/-
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी,सोलापूर